# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 12/07/2023 (बुधवार) दुपार

---

## शारीरिक व मानसिक छळ करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत १७ किमी अंतरावर दहेगाव येथे दिनांक ०१/०४/२०२३ ते २३/०५/२०२३ चे ००.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. रूपाली अमोल आंबीलडूके, वय २३ वर्ष रा. दहेगाव व आरोपी नामे– १) अमोल पूरनलाल आंबिलडूके हे पती पत्नी असून दिनांक १०/०३/२०२३ रोजी रितीरिवाजाने लग्न झाले असून लग्ना पासून पती १५ दिवस चांगले राहीले नंतर तू नातेवाईका सोबत बोलायचे नाही असे म्हणून शुल्लक कारणा वरुन वादविवाद करीत होते. दिनांक १७/०५/२०२३ रोजी तूला फोनची काय गरज आहे असे म्हणून हातातून फोन घेवून आरोपींनी फिर्यादीच्या वडीलांना रागाने तूम्ही २४ तारखेला घरी या नाही तर २५ तारखेला तूमची मूलगी असे म्हणून फोन बंद केले दिनांक २३/०५/२०२३ रोजी फिर्यादी यांचे वडील घरी आले पतीच्या कूटुंबातील लोक व फिर्यादी यांचे नातेवाईक असे मिळून मिटींग घेण्यात आली आरोपी पती व सासू नामे– २) सौ. कुंदा आंबिलडूके दोन्ही रा. दहेगाव यांनी फिर्यादी सोबत लग्न झाल्या पासून शुल्लक कारणा वरुन वादविवाद करुन शारिरिक व मानसिक त्रास दिला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपींविरुध्द कलम ४९८ अ ३४ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार गौतम मेश्राम मो. नं. ९८२२५४५१६९ हे करीत आहे.

## चोरी

**पो.स्टे. काटोल** :– अंतर्गत ०१ किमी अंतरावर जोशी मॉल बसस्थानक जवळ काटोल येथे दिनांक ११/०७/२०२३ चे १८.३० वा. ते १९.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– विनोदकुमार शिवभगवानजी शर्मा, वय ५८ वर्ष रा. चिखली माळोदे ता. काटोल हा जोशी मॉल मध्ये किराणा घेण्याकरिता आला असता किराणा घेवुन बिल देवुन घराकडे निघाला तेव्हा मोबाईल पाहीले असता दिसुन न आल्याने सि. सि. टी. व्ही मध्ये पाहीले असता कोणीतरी अज्ञात इसमाने टि–शर्टचे खिशातुन फिर्यादीचा वन प्लस कंपनीचा मोबाईल ज्यामध्ये व्होडाफोन कंपनीचा सिम व जि. ओ. कंपनीचा सिम जुना वापरता मोबाईल किंमती अंदाजे ४०,०००/– रू. चा कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलीस नायक वंदना खेडकर ब. नं. १८४६ पोस्टे काटोल मो. नं. ९९२२५६१८४६ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर